# 1. परराष्ट्र धोरण

१. परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या सांगून भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक स्पष्ट करा.

→ **प्रस्तावना :-**

राज्यशास्त्र या सामाजिक शास्त्रात व्यक्तीच्या राजकीय वर्तनासोबतच राष्ट्राच्या वर्तनाचाही अभ्यास केला जातो. राष्ट्राच्या वर्तनाचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंध व परराष्ट्र धोरण या दोन स्वतंत्र अभ्यास शाखेअंतर्गत केला जातो. राष्ट्रांच्या वर्तनातून परस्परांचे राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्याचे काम केले जाते. राष्ट्रीय हितसंबंधाची पुर्ती व राष्ट्रीय उद्दिष्टांची साध्यता हा परराष्ट्र धोरणाचा मुख्य आधार आहे.

मॉर्गेन्थॉच्या मते प्रत्येक राष्ट्र प्रत्येक धोरण यशस्वी करण्यासाठी साम-दाम-दंड-भेद या सर्व नितीचा अवलंब करून परराष्ट्र धोरण यशस्वी करतात.

इतर राष्ट्रांसोबतच संबंध निर्माण करण्यासाठी परराष्ट्र धोरणाचा वापर सेतु/पुल म्हणून केला जातो.

प्लेटोच्या मते जेव्हा तुम्ही राज्य निर्माण करता तेव्हा शेजाऱ्याकडे लक्ष द्या. परराष्ट्र धोरण ही एक व्यवहाराची पध्दती आहे. या पद्धतीचा वापर कला, शास्त्र, तत्वज्ञान अशा अनेक मार्गाने वापर सर्वच राष्ट्र करतात.

**१) परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या :-**

ॲरिस्टॉटलच्या मते मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय राहू शकत नाही जर कोणी समाजाशिवाय राहत असेल तर

तो देव अथवा दानव असला पाहिजे / असावा.

असा मनुष्य एकाकी जीवन जगू शकत नाही तसे राष्ट्रही इतर राष्ट्रासोबत संबंध निर्माण न करता राहू शकत नाही. राष्ट्राच्या विविध प्रकारच्या गरजा पुर्ण करण्यासाठी अनेक राष्ट्रांची मदत घ्यावी लागते. राष्ट्रांच्या या परस्परावलंबी धोरणामुळेच परराष्ट्र धोरण या अभ्यासशाखेचा उदय झाला.

परराष्ट्र धोरणाची संकल्पना ऐतिहासिक व प्राचीन आहे. ज्याचा उल्लेख प्लेटोच्या - 'द-रिपब्लिक', ॲरिस्टॉटलच्या - 'द पॉलिटिक्स', कौटिल्य - 'अर्थशास्त्र', मॅकेव्हली - 'द प्रिन्स' या ग्रंथात आहे. परराष्ट्र धोरणात स्वतःचे हितसंबंध पुर्ण करण्यासाठी ठरवलेले तत्व, कार्यक्रम, पद्धती / तंत्र / मार्ग / साधन / उद्दिष्ट्ये, भुमिका या सर्वांचा समावेश होतो.

परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हित साध्य करण्याचे एक साधन आहे. राष्ट्रीय हित ही परराष्ट्र धोरणाची गुरुकिल्ली आहे.

परराष्ट्र धोरण या संकल्पनेच्या खालीलप्रमाणे व्याख्या केल्या जातात.

1) नॉर्मन हिलच्या मते:-

एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या संदर्भात दुसऱ्या राष्ट्रासंबंधी केलेले प्रयत्न किंवा आखलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

2) प्रा. पिटमन पिटरच्या मते:-

परराष्ट्र धोरण म्हणजे आंतरराष्ट्रीय

संबंधात राष्ट्रीय योजना आणि परराष्ट्र सेवा यांच्या कार्यपद्धतीचे व राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी केलेले प्रयोजन होय.

3) चार्लस बर्टनच्या मते :

परराष्ट्र धोरण म्हणजे राजाने आपल्या सीमेबाहेरील क्षेत्रात प्रभाव टाकण्यासाठी केलेली कृती होय.

4) चार्ल्स लर्श :

एखादे विशिष्ट उद्दिष्ट्य प्राप्त करण्यासाठी निश्चित केलेली इतर राष्ट्रासंबंधीची कृतीशील योजना म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

2) परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक :

कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देण्याचे काम देशांतर्गत व देशाबाहेरील घटक करीत असतात. या सर्व घटकांना "परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक" म्हणतात.

परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात राज्यघटना ते सर्वसामान्य जनता यामधील सर्व घटकांचा समावेश केला जातो.

भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देण्याचे काम अनेक घटकांनी केले आहे. त्यातील काही घटक खालीलप्रमाणे आहेत.

i) भौगोलिक घटक :

प्राचीन काळापासूनच परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात भौगोलिक घटकाचा प्रभाव आहे.

प्लेटो राज्य समुद्रापासून दूर रहावे असे म्हणतो, ॲरिस्टॉटलच्या मते राज्य हे समुद्रापासून जवळ असावे. भूप्रदेशामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील देशाचे महत्व वाढते.
उदा., इंग्लंड - इंग्लंडच्या चारी बाजूने समुद्रकिनारा आहे तो युरोपपासून वेगळा जाणवतो तर इटली युरोप खंडात मध्यवर्ती स्थानात असल्यामुळे त्याला सतत युद्धजन्य परिस्थितीच विचार करावा लागतो.
भौगोलिक घटकांतर्गत राष्ट्राच्या विस्तृत (आकारमान) भूप्रदेश, भौगोलिक सीमा, भौगोलिक स्थान, हवामान, राष्ट्राची उत्पादक क्षमता इत्यादी भौगोलिक घटकाच्या प्रभाव परराष्ट्र धोरण निर्धारणावर होत असते.

ii) नैसर्गिक साधनसंपत्ती :-

कोणत्याही देशाला परराष्ट्र धोरण निर्मा करताना आपल्याकडील नैसर्गिक साधनसंपत्ती खनिजद्रव्य पैसा, कोळसा, अन्नधान्य इत्यादीचा विचार करावा लागतो. ज्या देशाकडे नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात आहे. त्या देशाला स्वतःच्या इच्छेप्रमाणे परराष्ट्र धोरण निर्धारीत करता येते.
उदा., आखाती देश मुबलक तेलसाठ्यामुळे OPEC सारख्या संघटनेच्या माध्यमातून जागतिक अर्थव्यवस्था नियंत्रित करतात.

iii) लोकसंख्या :-

परराष्ट्र धोरणाला निर्धारीत करताना राज्यातील लोकसंख्येचा विचार करावा लागतो. चीन आणि भारत

विशाल लोकसंख्या असलेले देश आहेत आपल्या देशाती-ल लोकसंख्येच्या मुलभूत गरजा पुर्ण करण्यासाठी पोषक ठरेल असे परराष्ट्र धोरण आखावे लागते. आक्रमण, युद्ध यासारखी धोरणे लोकसंख्येच्या आधारावरच ठरवली जातात. लोकांचे नैतिक धैर्य, राष्ट्रवादाची भावना जेवढी प्रखर असेल तेवढे परराष्ट्रा-शी संघर्ष करण्यास उपयुक्त ठरेल.

देशाची लोकसंख्या किती आहे? यापेक्षा ती कशी आहे? या गोष्टीला महत्व आहे.

लोकसंख्या कार्यक्षम, गुणवत्ताधारक, चारित्र्य-संपन्न, राष्ट्रप्रेमी, कष्टाळू, मानवी मुल्यांवर विश्वास ठेवणारी, त्याग व बलिदानासाठी तत्पर असणारी असावी तरच परराष्ट्र धोरणाला योग्य दिशा देण्याचे काम नेतृत्वाला घेता येते. युद्ध, नैसर्गिक संकट व आणिबाणीच्या प्रसंगी लोकांचा पाठिंबा असेल तर सरकार योग्य निर्णय घेऊ शकते.

५) आर्थिक स्थिती :

परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात आर्थिक स्थितीचा विचार प्राधान्याने केला जातो. राष्ट्राची आर्थिक स्थिती मजबूत असल्यास आपल्या इच्छेनु-सार परराष्ट्र धोरण ठरविता येते. देशांतर्गत वाढता रोजगार नैसर्गिक साधनसंपत्तीची मुबलकता परकीय चलनाचा वाढता साठा, वाढता आर्थिक विकास दर इत्यादी घटक राष्ट्राची आर्थिक स्थिती मजबूत करण्यास कारणीभूत असतात. अमेरिका, रशिया, इंग्लंड, कॅनडा, जपान, फ्रान्स, जर्मनी, चीन,

ब्राझील, ईस्त्राइल, आणि भारत अशी काही उदाहरणे सांगता येते ज्यांची आर्थिक स्थिती मजबूत आहे तर काहींची वाटचाल आर्थिक दृष्ट्या मजबूत होण्याकडे आहे. त्यामुळेच वरील देशांनी त्यांच्या इच्छेनुसार परराष्ट्र धोरणाला दिशा दिली आहे.

5) मित्र राष्ट्रे :-

परराष्ट्र धोरण ठरवताना मित्र राष्ट्र आणि शत्रु राष्ट्रांच्या विचार केला जातो. मित्रराष्ट्रांचे हित संबंध अनुकुलता यांच्या विचार करूनच परराष्ट्र धोरण ठरवता मित्र राष्ट्रांचे हितसंबंध व आपले हितसंबंध सुरक्षित राहतील अशीच भुमिका परराष्ट्र धोरणातून घेतली जाते.

उदा., 1962 च्या भारत-चीन युध्दातील सोवियत रशियाची तटस्थतेची भुमिका यामुळे भारत-रशिया मैत्रीमध्ये तणाव निर्माण झाला नाही. ईराक युद्ध च्यावेळी भारताने अमेरिकेसोबतच्या संबंधात कटुता न येऊ देता ईराक अमेरिका युद्धाला विरोध केला होता.

6) नेतृत्व :-

प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणावर तेथील नेतृत्वाच्या प्रभाव पडतो. उदा., स्वातंत्र्यानंतर पंडीत नेहरूंच्या शांतताप्रिय व सहकार्याच्या स्वभाव असल्यामुळे भारताने अलिप्ततावाद, पंचशील, अनाक्रमण, जागतिक सहकार्य व शांततेचे धोरण स्विकारले. नरेंद्र मोदी राष्ट्रवादाच्या विचारसरणीने प्रभावित

असल्यामुळे जशास तसे व कुटनितीचे धोरण स्विकारून सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक, नोटाबंदी, सबका साथ सबका विकास, अॅक्ट इस्ट, या धोरणाचा स्विकार केला हिटलर व मुसोलिनीचे व्यक्तीमत्व आक्रमक व साम्राज्यवादी असल्यामुळे जर्मनी व इटलीचे धोरण युद्ध खोर होते. इंदिरा गांधीच्या वास्तववादी व्यक्तीमत्वामुळे बांग्लादेश युद्ध यशस्वी झाले. 1972 ला रशिया सोबत 20 वर्ष संरक्षणाचा करार यशस्वी झाला 1974 ला अणु चाचणी घेण्यात आली. आंतरराष्ट्रीय राजकारणात ~~आपल्या~~ आपला प्रभाव वाढवण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला कुशल नेतृत्वाची आवश्यकता असते. ज्या ज्या देशांना कुशल नेतृत्व मिळाले त्या सर्वांची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिष्ठा व वर्चस्व वाढले आहे.

7) लष्करी शक्ती :-

परराष्ट्र धोरण ठरवताना स्वतः कडील व इतर राष्ट्रांकडील लष्करी शक्तीचा विचार करावा लागतो. आपल्या देशाकडे सैनिकी साहित्य युद्ध कौशल्य ~~अण्व~~ अण्वस्त्र, क्षेपणास्त्रे, रणगाडे, लष्कर या सर्वांची दखल घ्यावी लागते. अमेरिका, रशिया, चीन, उत्तर कोरीया यांच्यासारखी राष्ट्रे लष्करी शक्तीच्या सामर्थ्यावरच युद्धविषयक धोरणांचा अवलंब करतात 1962 ला भारत लष्करी शक्तीत कमकुवत होता म्हणूनच चीन सोबतच्या युद्धात तडजोडीचा मार्ग स्विकारावा लागला परंतू हिच स्थिती 2018 च्या भारत

चीन संबंधातील डोकलाम मुद्द्याबाबत दिसून येत नाही.

8) **राजनयाची ~~कुल~~ कुशलता :**

परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम राजनय करतात त्यामुळे कुशल अनुभवी व तज्ञ राजनयाची निवड परराष्ट्र धोरणात केली जाते. कुशल राजनयामुळेच राष्ट्राराष्ट्रात मैत्रीपुर्ण संबंध निर्माण होतात. राजनयाची भुमिका राजदूतासोबतच परराष्ट्र मंत्री, पंतप्रधान, परराष्ट्र सचिव विविध प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संघटनातील राष्ट्रांचे प्रतिनिधि बजावतात अलीकडे आर्थिक राजनयाचे महत्व वाढत आहे. उदा., हेन्री किन्सीजर या अमेरिकन राजदूत 1970 च्या दशकात भारत व रशियाच्या विरोधात अमेरिका, पाकिस्तान व चीन यांच्यात मैत्री घडवून आणली होती. 2019 च्या मंत्रीमंडळाच्या विस्तार करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कुशल राजनय असणाऱ्या व परराष्ट्र सचिव म्हणून कार्य करणाऱ्या एस. जयशंकर यांना भारताचे परराष्ट्र मंत्री बनवले. यावरून परराष्ट्र धोरण ठरवताना राजनयाची कुशलता किती आवश्यक आहे हे लक्षात येते

9) **आंतरराष्ट्रीय संघटना :**

परराष्ट्र धोरण ठरवताना देशांतर्गत व देशाबाहेरील घटकांचा प्रभाव जाणवतो देशाबाहेरील घटकांतर्गत मित्र राष्ट्र शेजारील देश या सोबतच आंतरराष्ट्रीय संघटनाही महत्वाची असते. आंतरराष्ट्रीय

संघटनेला मान्य होतील व पोषक असतील असेच धोरण ठरवावे लागते. परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना आंतरराष्ट्रीय कायदा युनोची राज्यघटना आंतरराष्ट्रीय संकेत प्रथा व परंपरांचा आदर व सन्मान करावा लागतो. अन्यथा आंतरराष्ट्रीय लोकमत आपल्या विरोधी बनते. उदा., भारताने स्वातंत्र्यापासूनच आंतरराष्ट्रीय संघटनांशी अनुकुल व पोषक ठरेल असेच धोरण आजपर्यंत बनवले आहे.

10) लोकमत :

परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थरावरील लोकमत जाणून घ्यावे लागते. लोकमताचा अनादर करणाऱ्या देशाला आपले परराष्ट्र धोरण योग्यरित्या ठरवता येत नाही लोकमताच्या आधारावरच शासन व्यवस्था टिकून असते. परराष्ट्र धोरणाचा संबंध राष्ट्राचे सार्वभौ-मत्व व देशांतर्गत असणाऱ्या जनतेच्या कल्याणाशी संबंधीत आहे.

11) कायदेमंडळाचे सहकार्य :

परराष्ट्र धोरण निर्धारण करताना कायदेमंडळाचा विचार करावा लागतो. जगातील सर्वच देशात परराष्ट्र धोरण ठरवताना कायदेमंडळाचे सहकार्य आवश्यक असते. आधुनिक लोकशाही शासन व्यवस्थेत अंतिम सत्ता कायदेमंडळाच्या हातात असते. त्यामुळे परराष्ट्र धोरण ठरवताना कायदेमंडळाची

अनुकुलता व प्रतिकुलता विचारात घ्यावी लागते. उदा., अमेरिकेसोबत अणुऊर्जा करार करताना मनमोहन सिंहच्या सरकारचा पाठींबा मार्क्सवादी पक्षाने काढल्यामुळे मनमोहन सिंहाचे सरकार अल्प मतात आले होते.

वरील प्रमाणे भारताच्या परराष्ट्र धोरणाला निर्धारीत करण्याचे काम अनेक घटक करतात. उदा., औद्योगिकरण, कृषी व्यवस्था, राजकीय विचारसरणी, राष्ट्राचे चारित्र्य व मनोधैर्य शासन व्यवस्था इत्यादी.

12) भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे :

जागतिकीकरणाच्या युगात राष्ट्रांचे परस्परावलंबित्व वाढले आहे. वाढत्या परस्परावलंबित्वामुळे देशादेशातील संबंधात गुंतागुंत वाढली आहे. देशांतर्गत व देशाबाहेरील परिस्थितीचा विचार करून परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे ठरवली जातात. प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट वेगवेगळे असतात. भारताचाही परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे यास अपवाद नाही. स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात सातत्याने बदल झाला आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टाचे वर्गीकरण खालील तीन भागात करता येते.

I) प्राथमिक उद्दिष्टे
II) मध्यवर्ती उद्दिष्टे
III) आंतरराष्ट्रीय उद्दिष्टे

I) प्राथमिक उद्दिष्टे :
भारतासाठी अत्यंत आवश्यक व मुलगामी स्वरूपाच्या उद्दिष्टांचा समावेश प्राथमिक उद्दिष्टात केला जातो. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या प्राथमिक उद्दिष्टात खालील उद्दिष्टांचा समावेश केला जातो.

i) भारताच्या राष्ट्रीय हिताचे रक्षण आणि संवर्धन करणे :
भारतीय राष्ट्रीय हिताचे रक्षण व संवर्धन करणे हे परराष्ट्र धोरणाचे प्राथमिक व मुलभूत उद्दिष्ट आहे. या उद्दिष्ट पुर्तीसाठीच स्वातंत्र्यापासून आजपर्यंत भारताने धोरण आखले आहे.
उदा., अलिप्ततावाद, पंचशील, सबका साथ सबका विकास इत्यादी दिनांक 23-7-2019 रोजी डोनाल्ड ट्रम्प यांच्या काश्मीर प्रश्नाच्या मध्यस्थी बाबतच्या भुमिकेविषयी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी भारतीय संसदेत मांडलेली भुमिका राष्ट्रीय हिताचे संवर्धन करणारे आहे. दहशतवाद, काश्मीर प्रश्न, डोकलाम, सिंधू नदीच्या पाणी वाटपाचा प्रश्न, बांग्लादेश प्रश्न, गोवा मुक्ती आंदोलन, हिंद महासागर अशा विविध प्रसंगी / प्रश्नी भारताने राष्ट्रीय हिताचे रक्षण आणि संवर्धनाची भुमिका आंतरराष्ट्रीय संघटना, प्रादेशिक संघटना द्विपक्षीय वार्ता बहुपक्षीय वार्ता अशा विविध प्रसंगी मांडली आहे.

ii) राष्ट्राचे संरक्षण :

परकीय शक्तीपासून आपल्या देशाच्या भौगोलिक सीमांचे संरक्षण हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. या उद्दिष्ट पुर्तीसाठी भारताने 1972 ला रशिया सोबत 20 वर्ष संरक्षणाचा करार केला. 1974 ला पहिली अणुचाचणी केली. 1998 ला दुसरी अणुचाचणी केली. राष्ट्राचे संरक्षण व्हावे म्हणूनच पुर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान वेगळा करून स्वतंत्र बांग्लादेशची निर्मिती केली. विविध प्रकारच्या लष्करी शस्त्रास्त्राची निर्मिती केली. उदा., क्षेपणास्त्रे

iii) राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण व संवर्धन करणे :

भारताचा सामाजिक व आर्थिक विकास देशांतर्गत असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून आहे. सोने, चांदी, पेट्रोल, डिझेल, पाणी, जमीन अशा विविध नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण व संवर्धन भारताकडून केले जाते. यासाठीच 2019 च्या मंत्रीमंडळात जनशक्ती मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. 2019 च्या अंदाजपत्रकात विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी कर सवलत देण्यात आली. सौरउर्जेच्या वापराला प्रोत्साहित करण्यात आले. गंगा नदीच्या शुध्दीकरणासाठी प्रयत्न करण्यात आले. स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. झाडे लावा झाडे जगवा अभियान, राबवले. पेट्रोल, डिझेल वाचवा या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. आठवड्यातून एक दिवस वाहनांचा वापर टाळावा हे धोरण घेतले.

iv) राष्ट्राचा आर्थिक विकास करणे :-

भारताचा आर्थिक विकास करणे भारतीय परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारे अनेक घटक परराष्ट्राकडून मिळवावे लागतात. त्यासाठी परराष्ट्र धोरणामार्फत धोरण आखावे लागते. तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ, कच्चा माल, यंत्रसामग्री इत्यादींची आवश्यकता आर्थिक विकासासाठी असते. या सर्व साधनांची उपलब्धी भारताने परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून केली आहे. 1947 ते 1990 या काळात सोवियत रशियाने भारताच्या आर्थिक विकासासाठी मदत करण्यास प्रारंभ प्रारंभ केला. म्हणून या काळात भारताचे परराष्ट्र धोरण रशियाच्या बाजूने अधिक झुकले होते. 2008 ला अमेरिकेसोबत नागरी आण्विक करार करून भारताचा आर्थिक विकास करण्याचे प्रयत्न झाले. आर्थिक विकास व्हावा म्हणूनच अलिप्ततावाद व सबका साथ सबका विकासचे धोरण आखले लुक इस्ट व ॲक्ट इस्ट या मागे आर्थिक विकासच आहे. बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेचा स्विकार, अनेक व्यवसायाचे खाजगीकरण या मागे ही आर्थिक विकासच आहे. भारताने अशी भुमिका घेतल्यामुळे आज तीव्र गतीने प्रगती करणारे देशातील सहावी अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उल्लेख केला जातो.

v) मित्र राष्ट्रांची संख्या वाढवणे :-

भारताने स्वातंत्र्यापासूनच मित्र राष्ट्रांची

संख्या वाढवण्यावर भर दिला आहे. स्वातंत्र्यपुर्व काळातील आफ्रो आशियाई राष्ट्रांचा परिषदेतील भारताचा सहभाग वसाहतींच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे समर्थन अनाक्रमण, अहस्तक्षेप, पंचशील, अलिप्ततावाद सबका विकास इत्यादी धोरणातून भारताने मित्र राष्ट्रांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. मित्र राष्ट्रांसोबत व्यापारी आर्थिक व राजनितीक संबंध वाढविणे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. या प्राथमिक उद्दिष्टपुर्तीसाठीच भारत-रशिया, भारत-अमेरिका, भारत-जापान, भारत-इंग्लंड भारत - ईस्त्राइल, भारत-ब्राझील, भारत - सिंगापूर, भारत - ऑस्ट्रेलिया, भारत - न्युझीलँड इत्यादी देशासोबत मैत्रीपुर्ण संबंध निर्माण केली जातात.

II) मध्यवर्ती उद्दिष्टे :

भारताच्या परराष्ट्र धोरणाची विभागणी उद्दिष्टांच्या दृष्टीकोनातून करताना मध्यवर्ती उद्दिष्टे असा शब्दप्रयोग करावा लागेल मध्यवर्ती उद्दिष्टांमध्ये जे उद्दिष्टे आवश्यक असतात परंतु अनिवार्य नसतात यांचा समावेश केला जातो. मध्यवर्ती उद्दिष्टांमध्ये खालील मुद्द्यांचा समावेश होतो.

i) राष्ट्राची प्रतिष्ठा वाढवणे :

स्वातंत्र्यापासूनच भारतीय नेतृत्वाने परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून भारताची प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. नेहरू ते नरेंद्र मोदी या सर्व पंतप्रधानांनी राष्ट्राची प्रतिष्ठा वाढवण्यास पुरक ठरेल अशाच प्रकारच्या संबंधाची निर्मिती केली आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय संबंध निर्माण करून आणि व्यापारी करार गरीब

राष्ट्रांना आर्थिक मदत लष्करी मदत मानवनिर्मित व नैसर्गिक संकट काळात मदत करून भारताची प्रतिष्ठा वाढवली आहे. उदा:- नेपाळमध्ये भूकंप ग्रस्त केलेली मदत, अफगाणिस्तानमध्ये लोकशाही स्थापन व्हावी म्हणून केलेले सहकार्य दहशतवादाच्या नायनाट व्हावा म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवाद विरोधी आघाडीस स्थापन करण्यास केलेले सहकार्य 2008 चे अमेरिकेसोबतचा नागरी अणिक ऊर्जा करार 1974 व 1998 ची अणुचाचणी अलिप्ततावादाचे धोरण अनाक्रमणाचे तत्व अहस्तक्षेपाचे तत्व युनोच्या स्थापनेतील योगदान इत्यादी धोरणामुळे भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठा वाढली आहे.

ii) विचार प्रणालींचा प्रभाव वाढवणे:-

भारताने परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून विचारप्रणालींचा प्रभाव वाढवला आहे. उदा:- अलिप्ततावाद, लोकशाही, समाजवाद, निशस्त्रीकरण, नविन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था, सबका साथ सबका विकास, पर्यावरणवाद आणि दहशतवाद, वंशवाद, धर्मवाद, साम्राज्यवाद, वसाहतवाद इत्यादीला विरोध करण्याचा प्रयत्न भारताने केला आहे. अलीकडील काळात भारत उदारमतवाद जागतिकीकरण बाजाराभिमूख अर्थव्यवस्था अशा विविध विचारप्रणालींच्या विकासासाठी व प्रचारासाठी प्रयत्न करत आहे. भारताने वरील विचार प्रणालीचा ~~भारताची~~ प्रभाव वाढवल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारताची प्रतिष्ठा वाढली आहे.

iii) **शेजारील राष्ट्रांसोबत मैत्रीपुर्ण संबंध निर्माण करणे:**

भारताने स्वातंत्र्यापासूनच शेजारील देशांवर आपला प्रभाव वाढवण्याचे काम केले यासाठी मैत्रीपुर्ण संबंधाचा आधार घेतला. उदा:- भारत-चीन 1954 चा पंचशील करार, भारत-पाक यांच्यातील शिमला करार व ~~तश्कंद~~ ताश्कंद करार, आग्रा शिखर वार्ता, लाहोर बस यात्रा, नरेंद्र मोदीची इस्लामाबादमधील भेट, कतारपुर कॉरीडोर सुरु करण्याची संबंधीची द्विपक्षीय चर्चा भारत-श्रीलंका संबंधात सुधारणा व्हावी म्हणून राजीव गांधी सरकारने लिट्टेल आणि सिंहली संघर्षात केलेली मदत भारत बांग्लादेश यांच्यातील जमीन विवाद संपवून आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या निर्णयाने बांग्लादेशला दिलेली जमीन (नरेंद्र मोदीच्या काळात) भारत-भूतान-चीन यांच्यातील डोकलाम प्रश्ने भारताने भूतानच्या भुमिकेचे केलेले समर्थन नेपाळमध्ये लोकशाही निर्माण व्हावी म्हणून भारतीय शासनाकडून झालेले सहकार्य (डॉ. मनमोहन सिंहच्या काळ) याशिवाय आपल्या शेजारील राष्ट्रांना अमेरिका व चीनच्या प्रभावापासून दूर करण्यासाठी केलेले प्रयत्न अशा विविध बाबीतून भारताने शेजारील राष्ट्रांसोबत मैत्रीपुर्ण संबंध निर्माण केले. 1974 ला व 1998 ला केलेली अणुचाचणी 1970 ला पाकिस्तानची फाळणी करून बांग्लादेशाची निर्मिती करून पाकिस्तानला कमकुवत करण्याचा केलेला प्रयत्न 1972 चा भारत-रशिया 20 वर्ष संरक्षणाचा करार व पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विविध देशांना भेटी देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारताची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी केलेले प्रयत्न या सर्व बाबी शेजारील राष्ट्रांवर प्रभाव

टाकण्याइतपत प्रभावशाली आहे.

iv) आशिया खंडाचे नेतृत्व करणे :
आशिया खंडाचे नेतृत्व करणे भारतीय परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट आहे. 1991 नंतरच्या भारतीय परराष्ट्र धोरणाने आशिया खंडाचे नेतृत्व करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. आशिया खंडाचे नेतृत्व करण्यासा आवश्यक धोरणांचा स्विकार भारत करत आहे. उदा:- अणुचाचणी घेणे, चांद्रयानाचे प्रक्षेपण करणे, अणु इंधन पुरवठा करणाऱ्या गटात सहभागी होणे. ब्रिक्स - आसियान यासारख्या संघटनांमध्ये सहभागी होणे. जागतिक शांतता व सुरक्षिततेला पोषक ठरेल अशा सबका साथ सबका विकास या धोरणाचा स्विकार करणे ~~आणि~~ इत्यादी याशिवाय विविध राष्ट्रांच्या समुहाचे नेतृत्व करण्याच्या दिशेने भारती परराष्ट्र धोरण वाटचाल करत आहे.

III) आंतरराष्ट्रीय उद्दिष्ट्ये :
सुरक्षासमितीमध्ये कायम सदस्यत्व मिळवणे
1991 नंतरच्या बदलत्या जागतिक विश्व रचनेचे संदर्भ देऊन भारत युनोच्या सुरक्षा समितीत कायम सदस्यत्व मिळवण्याच्या दिशेने प्रयत्न करत आहे. युनोच्या रचनेला 75 वर्षे झाली. युनोच्या सदस्य संख्येत 60 पटीने वाढ झाली जगाच्या अर्थव्यवस्थेला प्रभावित करण्याची क्षमता अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, रशिया, चिन या देशाशिवाय इतर अनेक देशात आहे. त्यामुळे युनोसहित सर्वच अंगांच्या

रचनेत विशेषतः सुरक्षा समितीच्या रचनेत बदल झाला पाहिजे अशी भुमिका भारत, ब्राझिल, दक्षिण आफ्रिका ही राष्ट्र घेत आहेत. त्याचाच भाग म्हणजे सुरक्षा समिती कायम सदस्यत्व मिळवण्याच्या दिशेने भारताने केलेले प्रयत्न.

i) आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य करणे :-

स्वातंत्र्यापासूनच आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य करण्याचे ध्येय भारताने बाळगले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेला स्थापनेपासूनच तिच्या उद्दिष्टपुर्तीसाठी भारताने वारंवार सहकार्य केले आहे. उदा :- युनोची शांतता मोहिम, प्रत्येक प्रश्न युनोच्या व्यासपिठावरून सोडवला जावा म्हणून स्वतः हून काश्मिर प्रश्न युनोमध्ये घेऊन जाणे, सुरक्षा समितीचे अस्थायी सदस्य म्हणून काम करणे, युनोने ठरवून दिलेल्या आंतरराष्ट्रीय कायदा व राष्ट्रांच्या आचार संहितांचे पालन केले आहे. दहशतवादाचे निर्मुलन, एड्स निर्मुलन, महिला सबलीकरण, पर्यावरणाचे संतुलन राखणे, कुपोषण मुक्त विश्व निर्माण करणे, बाल मजुरीस विरोध करणे. अशा अनेक सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक कार्यात भारताने युनोला सहकार्य केले आहे.

ii) आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे निवारण करणे :-

जागतिकीकरणाच्या युगात जगासमोर अनेक समस्या आहेत. या समस्येने जगातील अनेक राष्ट्र ग्रासलेले आहेत. यास भारतही अपवाद नाही.

दहशतवाद, मानवी हक्कांचे हनन, पर्यावरणाचे असंतुलन, वाढती गुन्हेगारी, शस्त्रास्त्रांचा व्यापार, अंमली पदार्थांची तस्करी, महिलांवरील शोषण व अत्याचार, गरीबी, कुपोषण इत्यादी प्रश्न जागतिक स्थरावर महत्वाचे बनले आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी भारतीय परराष्ट्र धोरण प्रयत्नशील आहे. या प्रश्नांच्या विरोधात युनो, आसियान, सार्क, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, जागतिक व्यापार संघटना, अशा विविध संघटनांमध्ये भारताने आवाज उठविला आहे.

iii) जागतिक शांतता व सुरक्षितता निर्माण करणे :

भारत हा महात्मा गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब अंबेडकर अशा अहिंसा व लोकशाही मुल्यांवर विश्वास ठेवणाऱ्या व त्या पद्धतीने जीवन जगणाऱ्या महामानवांचा देश आहे. शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी अहिंसा व लोकशाही हे प्रमुख साधन आहेत. यावर भारताचा विश्वास आहे. शांतता व सुरक्षितता राखावी म्हणूनच भारताने अलिप्ततावाद, अनाक्रमण, शांतता व सहजीवन, सबका साथ सबका विकास या धोरणाचा स्विकार केला. निःशस्त्रीकरण, ताश्कंद करार व शिमला करार हे भारताच्या शांततामय परराष्ट्र धोरणाचे प्रतिक आहेत.

वरील तीन प्रकारातून भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्‌दिष्टांची विभागणी केली जाते. या

सर्व उद्दिष्टांना व्यवहारात आणण्यासाठी भारताने राजकीय, आर्थिक, सैनिकी व प्रचाराच्या साधनांचा अधिकाधिक वापर केला आहे. ज्यामध्ये वाटाघाटी, करार, लष्करी सज्जता, मित्र राष्ट्रांच्या संख्येत वाढ करणे. इतर राष्ट्राला आर्थिक मदत करणे. प्रचार व प्रसार साधनांचा वापर करणे यावर अधिक भर दिला आहे.